# लोकसाहित्य आणि ग्रामीण उद्योजकता

*प्रा. डॉ. नवनाथ अंगद शिंदे*
प्रमुख, मराठी विभाग
लोकनेते पद्मभूषणडॉ. बाळासाहेब विखे पाटीलप्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सात्रळ, ता. राहुरी, जि. अहमदनगर, पिन : ४१३७११.
मो. ९८९०७७७६३९, ईमेल : nshinde70@gmail.com

गोषवारा/सारांश (Abstract):

लोकसाहित्य (Folklore) आणि ग्रामीण उद्योजकता (Rural Entrepreneurship) यांचा जवळचा संबंध आहे; लोकसाहित्यातील कथा, कला, परंपरा ग्रामीण उद्योगांसाठी प्रेरणा, कच्चा माल (उदा. हस्तकला, पारंपरिक ज्ञान) आणि बाजारपेठ देतात, ज्यामुळे स्थानिक कलाकारांना व कारागिरांना रोजगार मिळतो, संस्कृती जपली जाते आणि 'फोल्कप्रेन्युअरशिप' (Folkpreneurship) सारखे नवीन व्यवसाय मॉडेल उभे राहतात, जे आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडून ग्रामीण भागाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाला चालना देतात.लोकसाहित्य, लोकजीवन आणि पारंपरिक रोजगार यांचा निकटचा संबंध आहे, कारण लोकसाहित्य हे लोकांच्या लोकजीवनाचे प्रतिबिंब असते, ज्यात त्यांच्या चालीरीती, श्रद्धा, सण, कला आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांच्या पारंपरिक व्यवसायांची (उदा. शेती, कारागिरी, लोककला) माहिती मौखिक परंपरेतून (गाणी, कथा, म्हणी) जपलेली असते, जे त्यांच्या रोजच्या जगण्याचा आणि संस्कृतीचा अविभाज्य भाग दर्शवते. लोकसाहित्य आणि ग्रामीण उद्योजकतेमधील संबंध अभ्यासताना सांस्कृतिक भांडवल याचा प्रामुख्याने विचार करावा लागतो. लोकसाहित्य म्हणजे चालीरीती, गाणी, कथा, कला (उदा. भरतकाम, मातीची भांडी) यांचा खजिना आहे, जो ग्रामीण उद्योजकांसाठी कच्चा माल (Raw Material) आणि प्रेरणास्रोत आहे. पारंपरिक हस्तकला, लोककला यांसारख्या लोकसाहित्य-आधारित उत्पादनांना ग्रामीण उद्योजकता मॉडेलमध्ये रूपांतरित केले जाते, ज्यांना शहरी आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मागणी आहे.सांस्कृतिक पर्यटनाला गती मिळते. लोककथा आणि परंपरांवर आधारित अनुभव (उदा. ग्रामीण पर्यटन) पर्यटकांना आकर्षित करतात, ज्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते. लोकसाहित्यावर आधारित व्यवसायांमध्ये नैतिक पद्धती आणि शाश्वत विकासाचा समावेश केला जाऊ शकतो, ज्यामुळे ग्राहकांचा विश्वास वाढतो. सामाजिक आणि नैतिक ब्रँडिंग लोकसाहित्यामुळे घडते. लोकसाहित्यातील नमुने आणि डिझाइन वापरून उत्पादने बनवणे, जसे की पारंपरिक वस्त्रे, दागिने.

कृषी-आधारित उद्योग: पारंपरिक ज्ञान वापरून शेतीमालावर प्रक्रिया करणे, उदा. पारंपरिक पद्धतीने लोणची, मसाले बनवणे शक्य आहे. लोकनाट्य, लोकसंगीत, ग्रामीण मेळावे आयोजित करून ग्रामीण उद्योजकता विकास साधता येतो. स्थानिक कला आणि कौशल्यांना प्रोत्साहन देऊन रोजगार मिळतो, खासकरून महिला आणि तरुणांसाठी नव्या संधी शोधाता येतात. ग्रामीण भागातील लोकांना स्वयंरोजगाराच्या संधी सापडतात, त्यामुळे आर्थिक स्वावलंबन होते. ई-कॉमर्स आणि डिजिटल मार्केटिंगद्वारे लोकसाहित्य-आधारित उत्पादने जगभरात विकता येतात. लोकजीवनातील पारंपरिक ज्ञान आणि नैसर्गिक संसाधनांचा वापर करून पर्यावरणास अनुकूल व्यवसाय करता येतात. थोडक्यात, लोकसाहित्य हे ग्रामीण उद्योजकतेसाठी केवळ एक 'कच्चा माल' नसून, ते एक 'संपूर्ण व्यवसाय मॉडेल' आहे, जे ग्रामीण भागाला आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवून सांस्कृतिक वारसा जपण्यास मदत करते. लोकसाहित्य हे ग्रामीण समाजाच्या सांस्कृतिक जाणिवा, परंपरा, श्रमसंस्कृती आणि जीवनमूल्यांचे प्रतीक आहे. ग्रामीण उद्योजकता ही ग्रामीण भागातील आर्थिक विकास, रोजगारनिर्मिती व स्वावलंबनाचा प्रभावी मार्ग मानला जातो. प्रस्तुत संशोधनपर लेखात लोकसाहित्य आणि ग्रामीण उद्योजकता यांतील परस्परसंबंधाचा अभ्यास करण्यात आला आहे. लोककला, लोकगीते, परंपरागत कौशल्ये व सांस्कृतिक परंपरा या घटकांचा ग्रामीण उद्योजकतेवर होणारा प्रभाव स्पष्ट केला असून लोकसाहित्याधारित उद्योजकतेद्वारे शाश्वत ग्रामीण विकास कसा साधता येतो, याचे विश्लेषण करण्यात आले आहे.

मुख्य शब्द : लोकसाहित्य, ग्रामीण उद्योजकता, ग्रामीण विकास, लोककला, स्वावलंबन

## १. प्रस्तावना :

लोकसाहित्य आणि लोकजीवन यांचा निकटचा संबंध आहे. लोकसाहित्य म्हणजे लोकांच्या जीवनाचा, त्यांच्या विचारसरणीचा आणि जगण्याच्या पद्धतीचा आरसा असतो. लोकसाहित्यातून लोकजीवन पद्धती, लोकधर्म, ग्रामदैवते, सण-उत्सव, नातेसंबंध

आणि सामाजिक बांधिलकी दिसून येते. हे साहित्य पिढ्यानपिढ्या मौखिक परंपरेने (तोंडी) चालत आलेले असते, ज्यामुळे संस्कृती टिकून राहते. लोकसाहित्यात पारंपरिक व्यवसाय (उदा. शेती, मासेमारी, विणकाम, कुंभारकाम) आणि संबंधित कौशल्ये यांचे वर्णन आढळते, जसे की लोकगीते, लोककथा आणि म्हणी. लोकसाहित्यातून पारंपरिक ज्ञान आणि कौशल्ये एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होतात, ज्यामुळे त्या व्यवसायांची परंपरा अखंड राहते. पारंपरिक रोजगार हा लोकजीवनाचा भाग असल्याने, तो लोकसाहित्याच्या माध्यमातून लोकांची सांस्कृतिक ओळख बनतो. उदा. विशिष्ट प्रदेशातील कारागिरांची गाणी किंवा शेतकऱ्यांची गीते इत्यादी. शेती, लग्न, सण किंवा पारंपरिक कामांची गीते, व्यवसायाशी संबंधित अनुभवांचे सार, विशिष्ट व्यवसायातील अडचणी, यश किंवा दंतकथा, लोकनृत्य, पारंपरिक हस्तकला, ज्यामुळे स्थानिक कला आणि कौशल्ये जपली जातात.
थोडक्यात, लोकसाहित्य हे लोकजीवनाचे आणि पारंपरिक रोजगारांचे मौखिक भांडार आहे, जे लोकांच्या सांस्कृतिक आणि व्यावसायिक वारशाचे रक्षण करते.
गृहीतके :
१. लोकसाहित्याची सामग्री ग्रामीण उद्योजकतेला पूरक आहे.
२. लोककथा, लोकगीत आणि लोकनाट्य यामध्ये पारंपरिक ज्ञानाला उद्योजकता कौशल्य व सुयोग्य प्रशिक्षण लाभणे आवश्यक आहे.
३. लोकगीत, विधीनाट्य व नाट्यविधी यांना ग्राम आणि नागरसंस्कृतीत मागणी असते.
४. जत्रा प्रसंगी सादर होणाऱ्या प्रयोगरूप लोककलांना ग्रामीण उद्योजकतेची तंत्रे शिकविणे गरजेचे असते.
५. लोकजीवनातील भौतिक संस्कृतीला उद्योजकतेचे प्रशिक्षण दिल्यास व्यावसायिक स्वरूप प्राप्त होईल.

२. विषय मांडणी :
लोकसाहित्य लोकमानसाचे विविध वाङ्मयीन, सांस्कृतिक, कलात्मक आविष्कार या संज्ञेने सूचित होतात. पश्चिमेकडे ‘फोकलोअर’ची संकल्पना सर्वप्रथम समाजशास्त्र व मानवशास्त्र यांच्या अभ्यासातून निर्माण झाली. स्वाभाविकच फोकलोअरचा अभ्यास हा लोकसंस्कृतीचा अभ्यास म्हणून सांस्कृतिक मानवशास्त्र (कल्चरल अँथ्रपॉलॉजी) याच नावाने प्रारंभीच्या काळात झालेला आहे. फोकलोअरमध्ये लोकसंस्कृतीच्या जडणघडणीतील शाब्द साधने (वाच्यार्थाने वाङ्मय-लिटरेचर) व शब्देतर साधने (रूढी, चालीरीती, पारंपरिक कला, कारागिरी, क्रीडा, ज्योतिष, वैद्यक इ.) या सर्वांचाच समावेश झालेला आहे. प्रत्येक प्रगत संस्कृतीची मुळे लोकसंस्कृतीत असतात आणि लोकपरंपरेचे अनेक अवशेष प्रगत अवस्थेतही विद्यमान असतात, याचे भान लोकसाहित्याच्या चिकित्सक अभ्यासातून येते.भारतातही अनेक विद्यापीठांतून लोकसाहित्याभ्यासाच्या स्वतंत्र शाखा सुरू झाल्या आहेत. अनेक मानव्यविद्याशाखांतील अभ्यासक एकत्रितपणे संशोधन करीत आहेत. म्हैसूर विद्यापीठात मानसगंगोत्री येथे लोकसाहित्य-संग्रहालय उभे राहिले आहे. राजस्थानातही लोकसाहित्य-संग्रहालय आहे. लोककलांच्या अभ्यासासाठी आणि जतन-संवर्धनासाठी भारताचे सांस्कृतिक खाते सतत प्रयत्नशील आहे. लोकसाहित्याभ्यास हा केवळ भूतकाळातील संस्कृतिघटकांचा अभ्यास नसून मानवी संस्कृतीच्या आरंभापासून माणसाने अबोधपणे जतन केलेल्या जिवंत सांस्कृतिक जीवनाचा तो शोध आहे. म्हणूनच मानवाचा वर्तमान हा भूतकाळाने घडविलेला असतो आणि त्याचे भविष्य हे भूत-वर्तमानाच्या आधाराने उभे राहिलेले असते, याची समृद्ध जाण लोकसाहित्याच्या चिकित्सक अभ्यासातून येऊ शकते.
३. लोकसाहित्याचा विचार :
लोककथा, लोकगीते, म्हणी व उखाणे वगैरे शाब्द लोकसाहित्याचा विचार अनेकदा होतो. परंतु भारतभरच्या असंख्य जातिजमातींची त्यांच्या त्यांच्या बोलींमधून जातिपुराणे आहेत. अभिजात संस्कृत पुराणकथांची संवादी अशी लोकभाषेतील पुराणे आहेत. अनेकदा प्रचलित व सुप्रतिष्ठित पुराणातील संकल्पनांना व कथांना छेद देणाऱ्या कथा विविध जातिजमातींच्यापुराणांतून दिसतात. जातपंचायतीचे न्यायनिवाडे करणारे नियम त्या त्या जातिजमातीत परंपरेने चालत आलेले असतात. त्यांच्या मौखिक परंपरा असतात. एकापरीने ते त्या त्या समाजाचे, समाजशासनाचे नियम असलेल्या ‘स्मृति’ असतात. क्वचित त्यांची लिखित बाडे असतात. लोकसंस्कृतीच्याच नव्हे, तर एकूणच भारतीय संस्कृतीच्या अभ्यासकांचे या सर्व साधनांकडे अक्षम्य दुर्लक्ष झाले आहे. येथील संस्कृतीची गुंतागुंत उलगडण्यासाठी ही अत्यंत महत्वाची साधने आहेत. औद्योगिकीकरणाच्या व शहरीकरणाच्या प्रक्रियेत ही साधनेही लुप्त होत चालली आहेत. लोकसाहित्याचे अभ्यासक डॉ. प्रभाकर मांडे यांनी आपल्या गावगाड्याबाहेर या पुस्तकाच्या शेवटी मांग जमातीमधील ‘बसवपुराण’ नावाच्या एका

जातिपुराणाची संहिता छापलेली आहे. त्यातून भारतीय समाजाच्या भौतिक विकासातील कोडी सोडवण्यासही मदत होईल. अशी अनेक अलक्षित पुराणे सर्वदूर आहेत.

इष्ट ते साध्य करण्याचे व त्याचबरोबर अनिष्ट-निवारणाचे, रोगराई दूर करण्याचे अनेक मंत्र लोकभाषेत देवऋषी, भगत यांच्या परंपरेत आहेत. सर्वसामान्यांच्या रूढीतही असे लोकमंत्र आजही प्रचलित आहेत. ते समाजातील उच्चस्तरीय समजल्या जाणाऱ्या पांढरपेशा समाजातही आहेत. बालकाची दृष्ट काढतांना बायका जे पुटपुटतात तो एक लोकमंत्रच आहे. झोपताना उच्चारला जाणारा 'अस्तिक-स्मरण' हा लोकमंत्रच आहे. मंगळागौर पुजताना नववधू पुटपुटते, तो लोकपरंपरेने आलेला मंत्रच आहे. इच्छित प्राप्तीसाठी उत्कटपणे ताललयबद्ध शब्दसंहतीचे पुन्हा पुन्हा निष्ठेने उच्चारण करणे हे मंत्रलक्षण वरील सर्व उदाहरणांत आढळते. यावरूनही लोकसाहित्य म्हणजे केवळ ग्रामीण, खेडवळ व जुन्या लोकांचे साहित्य नव्हे, हे लक्षात येईल.लोकसाहित्याच्या स्वरुपाविषयी व व्याप्तीविषयीही मराठी साहित्याभ्यासक अद्याप उदासीनच आहेत. हल्ली त्यात थोडा बदल दिसतो. आहे. केवळ संकलनाच्या व भाबड्या आस्वादाच्या कक्षेबाहेर लोकसाहित्याचे अभ्यासक येत आहेत. संस्कृती, इतिहास, समाज, प्राचीन साहित्य, संतसाहित्य, समाजमानस इत्यादींचा शोध घेण्यासाठी लोकसांस्कृतिक समग्र दृष्टिकोण हा महत्त्वाचा व अपरिहार्य आहे, याचे भान अभ्यासकांना हळूहळू येत आहे.

कलाक्षेत्रात लोकपरंपरांतून चैतन्यस्वीकाराची प्रक्रिया वारंवार पुनरावृत्त होताना दिसून येते. १९७० नंतर एकूणच भारतीय कलाजीवनात आलेली स्थितिशीलता आणि मरगळ झटकून टाकण्यासाठी कलावंत पुन्हा पारंपारिक लोककलांचा नव्याने शोध घेऊ लागले आहेत. विविध प्रकारच्या हस्तकला, संगीतक्षेत्रात अभिजात लोकसंगीताचे प्रयत्न (उदा., कुमार गंधर्व), चित्रकलेत लोकचित्रकलेचा आविष्कार (उदा., हेब्बर), लोकवैद्यकाचा आयुर्वेदाच्या आधारे शोध घेण्याची प्रवृत्ती, लोकनृत्यांविषयीचे वाढते आकर्षण, नाट्याविष्कारामध्ये विविध लोकशैलींचे उपयोजन ही सर्व चिन्हे लोकसंस्कृतीविषयी नवे भान जागृत झाल्याची निर्देशक आहेत. लोकसंस्कृतीमधील अनौपचारिकता, लवचिकता, भावात्मकता यांचे आकर्षण औद्योगिक विकासात भौतिक सुखांच्या राशीवर लोळत असूनही एकाकी झालेल्या माणसाला वाटते आहे की काय? असे वाटण्याजोगी परिस्थिती आहे. एकूणच जीवनाचा विचार सुटासुटा न करता सामग्र्याने व्हावा, असे वाटणारा एक वर्ग आहे. तो लोकसाहित्याच्या अभ्यासाकडे अधिककरून वळतो आहे.

लोकसाहित्य हे ग्रामीण समाजाच्या जीवनपद्धतीचे, संस्कृतीचे व मूल्यव्यवस्थेचे प्रतिबिंब आहे. ग्रामीण उद्योजकता ही त्या समाजाच्या आर्थिक स्वावलंबनाची प्रक्रिया आहे. या दोन्ही घटकांमध्ये अतिशय घट्ट व परस्परपूरक असा संबंध आढळतो. लोकगीते, ओव्या, भारुडे, पोवाडे, कथा–कहाण्या यांतून श्रमप्रतिष्ठा, स्वावलंबन, सहकार, कष्टाची महती यांचा गौरव केला जातो. यामुळे ग्रामीण समाजात उद्योगशीलतेची मानसिकता निर्माण होते. लोकसाहित्यात वर्णन झालेली हस्तकला, लोककला, शेतीशी निगडित साधने, अन्नसंस्कृती (पारंपरिक पदार्थ) ही ग्रामीण उद्योजकतेची मूलभूत साधने ठरतात. उदा. हस्तकला, मातीची भांडी, विणकाम, लोकनृत्य, लोकवाद्ये, नाट्य, पारंपरिक खाद्यपदार्थांचे उत्पादन व विक्री इत्यादी. लोकसाहित्याच्या आधारे सण, जत्रा, यात्रा, लोककला महोत्सव आयोजित केले जातात. यामुळे ग्रामीण पर्यटन विकसित होऊन सांस्कृतिक पर्यटनाला आणि स्थानिक रोजगार व उद्योगांना चालना मिळते.

भारत हा कृषीप्रधान देश असून ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेचा कणा शेती, हस्तव्यवसाय व लघुउद्योग आहेत. या ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासात ग्रामीण उद्योजकतेची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. लोकसाहित्य हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून ते समाजाचे अनुभवसंचित, ज्ञानपरंपरा आणि कौशल्यांचे दस्तऐवजीकरण आहे. त्यामुळे लोकसाहित्य आणि ग्रामीण उद्योजकता यांचा अभ्यास परस्परपूरक ठरतो. एकूणच भारतीय समाज प्रामुख्याने कृषिप्रधान आहे. अशा समाजातील जीवन कुटुंबकेंद्री असते. ह्या व्यवस्थेतील श्रद्धांची आणि संकेतांची अनेक रुपे मराठी स्त्रीगीतांतून दिसतात. ह्या व्यवस्थेत कष्टांचा गौरव केला जातो. काम करणारी स्त्री सद्गुणी ठरते. त्यात तिला धन्यताही वाटते. इथल्या सर्वसामान्य माणसाचे ग्रामजीवन फारसे संपन्न नाही. पण 'सोन्याचा करंडा बाई मोत्यानं गुंफिला' असे स्वप्नरंजन खूप आहे.

४. समारोप :

भारतीय ग्रामीण समाज हा परंपरानिष्ठ व लोकसंस्कृतीप्रधान आहे. लोकसाहित्यामध्ये ग्रामीण जीवनातील श्रम, निसर्गाशी नाते, सहकार्य, श्रद्धा व आशा यांचे प्रतिबिंब आढळते. ग्रामीण उद्योजकता ही त्याच समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी आवश्यक असलेली प्रक्रिया आहे. या दोन्ही संकल्पना एकमेकींपासून वेगळ्या वाटत असल्या तरी त्यांचा परस्पर संबंध अतिशय घनिष्ठ आहे. लोकसाहित्य ग्रामीण उद्योजकतेला सांस्कृतिक अधिष्ठान पुरवते. लोकक्रीडा, लोकवैद्यक व लोकज्योतिष यांचा भारतीय संदर्भातील अभ्यास आणि संशोधन अजूनही अलक्षित व उपेक्षित असल्याचे आढळून येते. इष्ट ते साध्य करण्याचे व त्याचबरोबर अनिष्ट-निवारणाचे, रोगराई दूर करण्याचे अनेक मंत्र लोकभाषेत देवऋषी, भगत यांच्या परंपरेत आहेत. सर्वसामान्यांच्या रूढीतही असे लोकमंत्र आजही प्रचलित आहेत. नागर आणि ग्राम जीवनात लोकांच्या

अडीअडचणी, प्रश्न, समस्या सोडवण्यासाठी वरील बाबी विचारात घेतल्यास त्याला व्यावसायिक मार्गदर्शनाचे स्वरूप देता येईल, यानिमित्ताने अर्थाजन होईल. गाववाड्यातील ग्रामीण उद्योजकतेचे विविध कांगोरे तपासत असताना जातपंचायतीचे न्यायनिवाडे करणारे नियम त्या त्या जातिजमातीत परंपरेने चालत आलेले असतात. यामधील तंटामुक्तीच्या प्रकरणातून समूहाने एकत्र येऊन स्वनिर्मित अर्थसंकलन बँक उभारणी करता येऊ शकते. त्यानिमित्ताने ग्राम परिवर्तनाचे विकास कार्य करणे सुलभ होईल. भारतातल्या अनेक राज्यांमध्ये पारंपारिक कथाकथकांच्या व्यावसायिक जमाती आहेत. कथा सांगून जनसमुदायाचे मनोरंजन करीत गावोगाव भटकणे हा त्यांचा परांपरागत व्यवसायच आहे. पण आधुनिक जीवनसरणीमध्ये मनोरंजनाची आधुनिक तंत्रसाधने उपलब्ध झाल्याने आश्रयदात्यांच्या अभावी हा व्यवसाय नामशेष होत चालला आहे. लोककथांतून व्यक्तिमनावर ठसवल्या जाणाऱ्या मूल्यकल्पना, बोधकथांमागचे बोधवादी तात्पर्य, म्हणी-वाक्प्रचारांतले व्यावाहारिक शहाणपण व चातुर्य, लोकगीत-संगीतातील लयतालबद्धता, लोकमानसाचा समूहाविष्कार आणि त्या आविष्कारातला सरळ-साधेपणा व सहजस्वाभाविक सौंदर्य या माध्यमातून नागरी बाजारपेठा आपल्याशा करता येतील. लोकगीतांमधल्या लयतालाचा प्रभाव लिखित स्वरुपाच्या नागरकाव्यामध्ये पडलेला दिसून येतो. जनसमुदायाच्या मनोरंजनार्थ काही लोकगीते व लोकनाट्ये रचली व सादर केली जातात. ग्राम तसेच नागरी जीवनात याला उद्योजकतेचे व्यापक व्यासपीठ लाभणे गरजेचे आहे.

५. निष्कर्ष :

१. औद्योगिकीकरणाच्या व शहरीकरणाच्या प्रक्रियेत लोकसाहित्याच्या शाब्द आणि शाब्देत्तर सामग्रीचा विचार केल्यास ग्रामीण उद्योजकतेच्या अनुषंगाने रोजगार निर्मितीच्या नव्या दिशा सापडतात.
२. पुराणातील संकल्पनांना व कथांना स्पष्टीकरण तंत्राची जोड दिल्यास व्यावसायिक मार्गदर्शनाचे स्वरूप देता येईल.
३. लोकजीवनातील पारंपरिक उद्योग, कला निर्मितीला नव तंत्रज्ञानाची जोड देऊन गावगाड्याबाहेर आणणे आवश्यक आहे. या निमित्ताने ग्रामीण उद्योजकता हक्काची बाजारपेठ मिळेल.
४. लोकपरंपरेतील कुशल कारागीर, भौतिक संस्कृती जतन करणारा समाज यांच्या श्रमाला प्रतिष्ठा दिल्यास भारतीय समाजाच्या भौतिक विकासातील कोडी सोडवण्यासही मदत होईल.
५. लोकपरंपरेचे अनेक अवशेष प्रगत अवस्थेतही विद्यमान असतात, याचे भान लोकसाहित्याच्या चिकित्सक अभ्यासातून येते. यालाच व्यावसायिक रूप देणे आता काळाची गरज आहे.
६. लोकनाट्यातील संरचनेला पारंपरिकता आणि आधुनिकता यांचा मिलाप घातल्यास जुन्या ज्ञानाला उद्योजकतेच्या अनुषंगाने घेऊन जाता येईल.
७. भारतातल्या सर्व भाषेत लोकगीते गायली जातात. यांच्या पारंपरिक झाली, शब्दप्रयोग, उच्चारण शैली, सादरीकरणाची लकब याला व्यवसायिकतेची जोड दिल्यास नवाविष्कार आणि अर्थार्जनाचा नवा मार्ग सापडेल. लोकसंस्कृतीतील अप्रसिद्ध लोकगीतांच्या चालीला जागतिक स्तरावर उद्योजकतेचे नवे आयाम प्राप्त होतील.
८. हस्तकला, विणकाम, मातीची भांडी, लोहारकाम यांसारख्या कौशल्यांचा वारसा लोकसाहित्यातून पुढील पिढीकडे जातो. कुंभारकाम, लोहारकाम, लोककला इत्यादी व्यवसाय लोकसाहित्यातून पिढ्यानपिढ्या जपले गेले आहेत. ही कौशल्यपरंपरा ग्रामीण उद्योजकतेचा पाया बनते.
९. स्थानिक कथा, परंपरा व लोककला उत्पादनांना वेगळी ओळख देतात.
१०. निसर्गपूजक लोकपरंपरा पर्यावरणपूरक उद्योजकतेला चालना देतात.
११. जत्रा, सण-उत्सव, लोकनृत्ये, लोकनाट्ये यांवर आधारित पर्यटनामुळे ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती व आर्थिक चक्र वाढते.
१२. लोकसाहित्य हे ग्रामीण उद्योजकतेसाठी सांस्कृतिक व बौद्धिक भांडवल आहे. लोकपरंपरेशी जोडलेली उद्योजकता अधिक शाश्वत, लोकाभिमुख आणि यशस्वी ठरते. त्यामुळे ग्रामीण विकासाच्या धोरणात लोकसाहित्याचा समावेश करणे काळाची गरज आहे.
१३. लोकसाहित्यातील स्त्रीजीवनाचे चित्रण, ओव्या व लोकगीतांतील स्त्रीशक्ती ग्रामीण महिलांना स्वयं-सहायता गटांद्वारे उद्योग सुरू करण्याची प्रेरणा देते.

लोकसाहित्य ग्रामीण भागाला स्वतंत्र सांस्कृतिक ओळख देते. ही ओळख ग्रामीण उत्पादनांना बाजारपेठेत वेगळे स्थान मिळवून देते (उदा. 'स्थानिक परंपरेशी जोडलेले उत्पादन'). लोकसाहित्य सामूहिकता, सहकार्य आणि परंपरा जपण्याची भावना वाढवते. ही सामाजिक एकजूट स्वयंरोजगार, बचतगट, सहकारी संस्था यांसाठी पोषक ठरते. आज डिजिटल माध्यमांतून लोककथा, लोकगीते, पारंपरिक ज्ञान यांचे सादरीकरण करून नव्या पिढीला आकर्षित करता येते.

यामुळे लोकसाहित्याधारित स्टार्टअप्स व लघुउद्योग निर्माण होत आहेत. लोकसाहित्य आणि ग्रामीण उद्योजकता हे एकमेकांना पूरक आहेत. लोकसाहित्य ग्रामीण समाजाला सांस्कृतिक बळ देते, तर ग्रामीण उद्योजकता त्या संस्कृतीला आर्थिक स्थैर्य प्रदान करते. त्यामुळे शाश्वत ग्रामीण विकासासाठी लोकसाहित्याचे संवर्धन व उद्योजकतेचा विकास एकत्रितपणे घडवणे अत्यावश्यक आहे. लोकजीवनातील वर्तमानकालीन गरजा लक्षात घेऊन लोकसाहित्याच्या अभ्यासाला त्यामधील विविध घटकांना व्यावसायिकता आणि जागतिक बाजारपेठेत प्रत्यक्ष स्थान मिळवण्याच्या अनुषंगाने जरूर विचार करणे आवश्यक आहे.

संदर्भसूची

१. Danieis, C. L. Stevans, C. M. Ed. Encyclopedia of Superstitions, Folklore, and the Occult Sciences of the World, London, 1971.
२. Leach, Maria, Ed. Dictionary of Folklore, Mythology qnd Legend, New York, 1949.
३. अग्रवाल, वासुदेवशरण, प्राचीन भारतीय लोकधर्म, अहमदाबाद, १९६४.
४. गोडसे, द. ग. लोकघाटी, मुंबई, १९७९.
५. ढेरे, रा. चि. लोकसंस्कृतीचे उपासक, पुणे, १९६४.
६. बाबर, सरोजिनी, संपा. लोकसाहित्य : भाषा आणि संस्कृति, पुणे, १९६३.
७. भवाळकर, तारा, लोकनागर रंगभूमी, पुणे १९८९.
८. मांडे, प्रभाकर, लोकसाहित्याचे स्वरुप, औरंगाबाद, १९८९.
९. मोरजे, गंगाधर, लोकसाहित्य : एक स्वतंत्र अभ्यासक्षेत्र, पुणे, १९८५.
१०.डॉ. शिंदे,नवनाथ, लांडे,सिद्धार्थ, खंडागळे,ज्योत्स्ना(संपा.)'लोकसाहित्य : अभ्यासाच्या नव्या दिशा',२०२४.

• **Copyright & License:**
© Authors retain the copyright of this article. This work is published under the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY 4.0), permitting unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.